# जिल्हा न्यायालय, भंडारा
## परिपत्रक

क्रमांक बी—१६(१)/०७/१९८७, भंडारा दिनांक ०६/०४/२०२०

मा. उच्च न्यायालय, मुंबई च्या ई—कमेटी यांच्या निर्देशानुसार कोविड—१९ या रोगाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेमुळे सर्व वकील व पक्षकार यांनी प्रत्यक्षरित्या न्यायालयामध्ये हजर न राहण्याचे व्हिडीयो कॉन्फरन्सिंगद्वारे प्रकरणे चालविण्याचे सुचित केलेले आहे.

सबब उच्च न्यायालय, मुंबई यांच्या सुचनेनुसार जिल्हा न्यायालय, भंडारा व तालुका अंतर्गत येणा—या सर्व वकील व पक्षकार यांना सुचीत करण्यात येते की, जिल्हा न्यायालय, भंडारा तसेच तालुका न्यायालय मोहाडी/तुमसर/लाखनी/लाखांदूर/पवनी व साकोली मार्फत व्हिडियो कॉन्फरन्सिंगची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे.

अतिमहत्वाच्या प्रकरणामधील कामकाजासाठी जिल्हा न्यायालय, भंडारा येथील तळ मजला कक्ष क्रमांक ९ मध्ये व्हिडियो कॉन्फरन्सिंगची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच न्यायीक अधिकारी त्यांना उपलब्ध करून देण्यात आलेल्या निजी कक्षातील व्हिडीयो कॉन्फरन्सिंग युनीट द्वारे सुनावणी घेतील. सदर सुविधा कार्यालयीन वेळेत सकाळी १२ ते दुपारी २.०० वाजेपर्यंतच सुरू राहील. वकील व पक्षकार यांनी व्हिडीयो कॉन्फरन्सिंगची सुविधा मिळविण्यासाठी न्यायालयांच्या ई—मेल आय डी वर अर्ज करणे आवश्यक आहे.

## व्हिडीयो कॉफरन्सिंग सुविधा वापरण्याबाबतची माहिती

१. अतिमहत्वाच्या व अतितत्काळ प्रकरणांमध्ये संबंधीत वकील/पक्षकार यांनी ई—मेलद्वारे व्हिडीयो कॉन्फरन्सिंग घेण्याबाबत विनंती अर्ज एक दिवस आधी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० यावेळेत उपरोक्त नमुद ई—मेल वर कळविणे आवश्यक आहे.

२. विनंती अर्जासोबत प्रकरणाचे स्कॅन/पीडीएफ प्रत जोडणे आवश्यक आहे. तसेच अर्जावर वकीलाचे बार कौन्सील नोंद क्रमांक/रजिस्ट्रेशन क्रमांक, मोबाईल फोन क्र. व वकीलांचे ओळखपत्र ची स्कॅन कॉपी जोडणे आवश्यक आहे.

३. संबंधीत अधिक्षक/सहा. अधिक्षक यांनी प्रकरणे संबंधीत न्यायीक अधिका—यांचे निर्देशावरून प्रकरणांचे महत्व तात्काळ ठरवुन व्हिडीयो कॉन्फरन्सिंग साठीची वेळ व दिनांक संबंधीत वकील/पक्षकार यांना ई—मेल द्वारे कळविणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे संबंधीत प्रकरणावर वस्तुत: स्थिती नोंदविणे आवश्यक आहे. त्यासाठी ई—मेल आयडी देणे आवश्यक आहे.

४. न्यायालयाने अर्ज मंजूर केल्यानंतर संबंधीत वकील/पक्षकार यांना सुनावणीची तारीख व वेळ ई—मेल द्वारे सुचीत करण्यात येईल त्यावेळी त्यांनी उपस्थिती नोंदवावी.

<u>अर्ज करण्यासाठी न्यायालयांचे ई—मेल आय डी</u>

| अ. क्र. | न्यायालयाचे नाव | ई—मेल आय डी |
|---|---|---|
| १ | जिल्हा न्यायालय, भंडारा | mahbhadc@mhstate.nic.in |
| २ | दिवाणी न्यायालय क. स्तर, मोहाडी | mohadicjjd@gmail.com |
| ३ | दिवाणी न्यायालय क. स्तर, तुमसर | tumsarcjjd@gmail.com |
| ४ | दिवाणी न्यायालय क. स्तर, लाखनी | lakhanicjjd@gmail.com |
| ५ | दिवाणी न्यायालय क. स्तर, लाखांदूर | lakhandurcjjd@gmail.com |
| ६ | दिवाणी न्यायालय क. स्तर, पवनी | paunicjjd@gmail.com |
| ७ | दिवाणी न्यायालय क. स्तर, साकोली | sakolicjjd@gmail.com |

जिल्हयातील सर्व न्यायालयांनी त्याप्रमाणे तरतूद करावी.

सदर सुविधा हि फक्त दि. ०६/०४/२०२० ते लॉकडाऊन कालावधीकरीता उपलब्ध राहील.

(संजय आ. देशमुख)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
भंडारा

दि. ०६/०४/२०२०

Endt. No. B-2(14)/774/1992. DSA

Copy submitted /forwarded to the : -

1. District Judge – 1 and Additional Sessions Judge, Bhandara.
2. District Judge – 2 and Additional Sessions Judge, Bhandara.
3. Civil Judge (Sr. Dn), Fast Track Court, Bhandara.
4. Civil Judge (Sr. Dn), Bhandara
5. Chief Judicial Magistrate, Bhandara.
6. Civil Judge, (Sr. Dn.), Link Court, Bhandara
7. Secretary, D.L.S.A., Bhandara.
8. Jt./2nd/3rd Jt. Civil Judge (Sr. Dn.), Bhandara.
9. Jt./2nd/3rd Jt. Civil Judge (Jr. Dn.), Bhandara.
10. Civil Judge, Jr. Dn. & JMFC, Sakoli/Tumsar/Mohadi/Pauni/ Lakhani/Lakhandur.
11. Jt. Civil Judge, Jr. Dn. & JMFC, Tumsar/Lakhani/ Mohadi/Pauni.
12. P.A. to Principal District & Sessions Judge, Bhandara.
13. District Government Pleader, Bhandara.
14. The Additional/Assisant Director of Prosecution, Bhandara.
15. The President/Secretary, Bhandara Bar Association, Bhandara.
16. The President/Secretary, Taluka Bar Associations Sakoli/Tumsar/Mohadi /Pauni/Lakhani/Lakhandur.

for information and necessary action.

District Court, Bhandara.
Date 6th April, 2020.

Registrar
District Court, **Bhandara.**
06/04/2020